रेमुन क्र. ७३/२०१५
**श्री अप्पास्वामी संस्थान वि चंद्रशेखर**

**निशाणी ४२ वरील आदेश**
**(पारीत दिनांक ०८.०१२.२०२१)**

प्रस्तुतद्वारे वादीने अर्जात नमुद केल्या प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादीने सदर अर्जाच्या पाठीमागील बाजुस त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध्द दर्शविला आहे.

**०२** अर्ज त्यासोबतचे शपथपत्र म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुच्या विधिज्ञाचा युक्तिवाद ऐकला.

**०३** अर्जातील कथन, म्हणणे व युक्तिवादाचा विचार करता खालील वाद प्रश्न निमार्ण होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढील प्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जातीत मागणी केल्याप्रमाणे वादीस दुरुस्तीची परवानगी देता येईल का ? | होय |
| २. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा**

**वाद प्रश्न क्र. ०१ करिता**

**०४** प्रस्तुत दावा वादीने घोषणेसाठी व खरेदीखत रद्द होऊन मिळणेकामी व कायमच्या मनाई हुकूम तसेच दावामिळकतीचा ताबा व दरम्यानचे उत्पन्न मिळण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादीने हजर होऊन त्याची कैफियत सादर केल्यानंतर मुद्देही कायम करण्यात आले आहेत. आता दावा वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित असताना सदरच्या ठप्पयावर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**०५** वादी अर्जात असे नमुद करतो की, दावा करते वेळी उपविभागीय अधिकारी वाशिम यांच्याकडे अपील प्रलंबित होते, त्यांनतर अतिरिक्त आयुक्त अमरावती यांच्या न्यायालयात सदरचा अपील खारीज करण्यात आले आहे. वादीला त्याअनुषंगेचा मजकुर दाव्यात समाविष्ट करावयाचा आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही तसेच प्रतिवादीला कोणतेही नुकसान नाही व दाव्याच्या न्याय निकालासाठी सदरची दुरुस्ती आवश्यक आहे, असे ही वादीचे कथन आहे. तर प्रतिवादी म्हणण्यानुसार अर्ज मुदतीत नाही. अर्जाला कारण घडले नाही. प्रस्तुतचा विलंबाने दिलेला आहे त्यामुळे तो नामंजुर करावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

**०६** प्रतिवादीने हजर होऊन त्याची कैफियत सादर केल्यानंतर मुद्देही कायम करण्यात आले आहेत. आता दावा वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित असताना सदरच्या ठप्पयावर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. वादी पुढील मजकुर परिच्छेद ०९ नंतर दाव्यात समाविष्ट करु इच्छीतो.

**" That the plaintiff has presented an appeal before the learned Sub Divisional Officer, Washim agaisnt the decision of Revenue Court, Risod. That, the said appeal is allowed and thereafter the deft. Have filed appeal before the Additional District Collector, Washim which is also dismissed, thereafter the said order is also challanged by the deft. Before the Hon'ble Additional Commissioner (Revenue) Amravati & that appeal is also dismissed on 29 Sep 2018".**

**०७** दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ हा दाव्यातील पक्षकारांना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार परवानगीची संधी देणे असा आहे. दुस–या बाजुचे अपरिमीत नुकसान होत किंवा त्यांच्यावर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरुस्ती मान्य करायला न्यायालयास मुभा आहे. जर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात काही बदल होणार नसेल तर दुरुस्ती मान्य करता येते.

**०८** प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादीने मागितलेली दुरुस्ती ही आश्यर्चकारक अशी नाही अथवा ती दाव्याच्या मुळ स्वरुप ही बदलवणारी नाही. कारण वाद पत्रातील परिच्छेद ०९ मध्ये वादीने फेरफार व त्यासंबंधीत असणारे महसुल न्यायालयासमोरील अपीले याचा उहापोह केला आहे. प्रतिवादीला ही सदरच्या बाबी ज्ञात आहेत. सदर अपीलाच्या अनुषंगे घडलेल्या पुढील घडामोडी तसेच त्याअनुषंगाचा मजकुर वादी हा दाव्यात समाविष्ट करु इच्छीत आहे. थोडक्यात,

तो वाद पत्रात अपीलाच्या अनुषंगेच्या नंतरच्या घडामोडी बाबत मजकुराचे विस्तृती व अतिरिक्त मजकुर जो कथीत अपीलाच्या संदर्भात आहे. तो समाविष्ट करु इच्छीतो आहे.

**<u>०९</u>** वादीने अर्जासोबत शपथपत्रे दिलेले आह. वादीस अर्जात नमुद केल्याप्रमाणे नियोजीत दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीने अद्याप त्याचा पुरावा दिलेला नाही. वादीने दावयात दुरुस्ती केल्यास त्याअनुषंगेचा प्रतिवादीस वाटल्यास तो बचावही/अतिरिक्त कैफियतीद्वारे त्याचे म्हणणे मांडु शकतो. या ठिकाणी दाव्याचे अनेकीकरण टाळुन वादी व प्रतिवादी यांच्यातील दाव्यातील संख्या मर्यादीत ठेवणाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्जातील विनंतीनुसार दुरुस्तीस परवानगी देणे न्यायोचित आहे. तसेच प्रस्तुत नियोजीत दुरुस्तीने प्रतिवादीचे अपरिमीत असे हानी होईल असेही दिसुन येत नाही. या ठिकाणी हे सुध्दा नमुद गरजेचे वाटते की, प्रस्तुतचा अर्ज हा मार्च २०२० मध्ये दिलेला आहे व महसुल न्यायलयासमोरील निकाल सप्टेबर २०१८ रोजी झालेला आहे, या प्रतिवादीच्या म्हणण्याचा विचार करता थोडसा विलंब अर्ज दाखल करण्यास झालेला आहे. मात्र सदरचा झालेला विलंब व त्यानंतर कोराना महामारीची उद्भवलेली परिस्थीतीचा विचार करता वादीवर खर्चाचा भार टाकणे उचीत होणार नाही. सबब, मुद्दा क्र. ०१ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**वाद प्रश्न क्र. ०२ करीताः-**

**<u>१०</u>** वरील विवेचनाअंती व निष्कर्षावरुन वादीने अर्जाअन्वये मागितलेल्या नियोजित दुरुस्तीस परवानगी देणे योग्य असल्याने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. वादीचा निशाणी ४२ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीस दाव्यात/वादपत्रात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

०३. सदरची दुरुस्ती वादीने विहित मुदतीत करावी व दुरुस्ती प्रत सादर करावी.

०५. सदर अर्जाचा खर्च वादी/अर्जदार यांच्यावर असे.

स्वा/-

दिनांकः-०८.१२.२०२१

(एस.एन.गवळी)

प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, रिसोड

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R.D.Pandit |
| Court | :- | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | :- | 08/12/2021 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 08/12/2021 |
| Judgment/Order uploaded on | :- | 08/12/2021 |